


दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com




सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ६८ वा | शुक्रवार, दि. ०२ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR




पद्मशाली शिक्षण संस्था संचलित

**महाविद्यालय विभाग**

अे.आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय
कुचन कनिष्ठ महाविद्यालय
कुचन कनिष्ठ महाविद्यालय व्यवसाय शिक्षण
सौ.भू.म. पुल्ली कन्या कनिष्ठ महाविद्यालय
रामकृष्णपंत बेत रात्र कनिष्ठ महाविद्यालय
देविदास न. बत्तीन तांत्रिक प्रशिक्षण विभाग

**माध्यमिक विभाग**

कुचन प्रशाला
कुचन प्रशाला - तेलुगु माध्यम
सौ.भू. म. पुल्ली कन्या प्रशाला
मातोश्री जनाबाई ज. बिटला प्रशाला
रामकृष्णपंत बेत रात्र प्रशाला
डि. आर. श्रीराम इंग्लिश मि. स्कूल

**प्राथमिक विभाग**

नारायणराव कुचन प्राथमिक शाळा
राजमल ना. बोमड्याल प्राथमिक शाळा
रामदास न. इप्पाकायल प्राथमिक शाळा
रामव्वाबाई रा. बुर्ला प्राथमिक शाळा
डि.आर.श्रीराम इंग्लिश मि.प्रायमरी स्कूल
मातोश्री आशाताई अंबादास सरगम सेंट्रल स्कूल

**बालक मंदिर विभाग**

भूदेवीबाई कटकम बालक मंदिर
भारतीबाई रा. बोमड्याल बालक मंदिर
भूदेवीबाई रा.इप्पाकायल बालक मंदिर
रामव्वाबाई रा. बुर्ला बालक मंदिर
डि. आर. श्रीराम इंग्लिश मि. स्कूल
मातोश्री आशाताई अंबादास सरगम सेंट्रल स्कूल

सर्व प्राचार्य, उपप्राचार्य, मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद..

## संपादकीय

### सरकारला काळजी कुणाची- नफेखोर रुग्णालयांची की लोकांची?

कर्करोगावरील औषधांसाठी दहा पट जादा रक्कम आकारण्यात येत असल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने केंद्र सरकारची कानउघाडणी केली. कर्करोगावरील औषध हे किरकोळ विक्रेत्यांना तीन हजार रुपयांना पुरवले जात असताना ग्राहकांना ते २७ हजार रुपयांना विकले जाते.

ही जवळपास दहा पट जादा रक्कम ही कोणाच्या खिशात जाते, असा सवाल न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि संदीप मेहता यांच्या खंडपीठातील न्या. मेहता यांनी केला. 'कोलेस्टेरॉल'वरील औषधी गोळ्यांची विक्रेत्यांसाठीची किंमत ७० रुपये असताना ग्राहकांना २४० रुपये मोजावे लागतात याकडेही खंडपीठाने लक्ष वेधले. केंद्र सरकारच्या २०१३च्या औषधे किंमत नियंत्रण आदेशानुसार ३८४ औषधांवर कमाल किरकोळ किमतीच्या १६ टक्के वाढीव मूल्य आकारण्याची मुभा देण्यात आली होती. हा नियम इतक्या कमी औषधांपुरताच कसा, असा सर्वोच्च न्यायालयाच्या म्हणण्याचा अर्थ होतो. सरकारने किमान एक हजार औषधांचे दर-नियंत्रण या प्रकारे करावे, अशी अपेक्षा आरोग्य क्षेत्रात निरलसपणे (अपवादात्मक!) काम करणार्यांनी आजवर वारंवार व्यक्त केली होती, ती पूर्ण होण्याचे दार न्यायालयाच्या या सवालामुळे किलकिले तरी झाले. पण यावरील सुनावणी अद्याप सुरू असून सरकारची बाजू मांडणारे महान्यायअभिकर्ता (सॉलिसिटर जनरल) तुषार मेहता यांनी 'सरकारला यातून मार्ग काढावा लागेल,' असे मोघम विधान न्यायालयात केले आहे.

वाढीव औषध दरांचा फायदा औषधांची निर्मिती करणार्या कंपन्यांनाही होत नाही. तो मोठी रुग्णालये उकळतात हे सरकारच्या वतीने तुषार मेहतांनीही मान्य केले. त्याआधी, अनेक मोठी रुग्णालये आवारातील औषधांच्या दुकानांमधून किंवा विशिष्ट दुकानांमधून औषधांची खरेदी करण्याची सक्ती करतात. रुग्णांच्या नातेवाईकांनी बाहेरून औषधे खरेदी केल्यास रुग्णांवर उपचार करण्यास नकार देतात, असेही निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. बहुतांश मोठ्या व काही छोट्याही रुग्णालयांमध्ये असलेल्या औषध दुकानांमधूनच औषधांची खरेदी करण्याची सक्ती केली जाते. अलीकडे काही तज्ज्ञ डॉक्टरही रुग्णांना विशिष्ट दुकानांमधून औषधे खरेदी करण्यास सांगतात. खासगी रुग्णालयांवर कोणतीही बंधने नसतात. ती सरकारी नियंत्रणही मान्य करीत नाहीत. सरकारी सोयीसुविधांचा फायदा किंवा सवलतीच्या दरात भूखंड खरेदी केला असल्यास काही खाटा या धर्मदाय म्हणून राखीव ठेवणे, त्यासाठी स्वस्त दर आकारणे रुग्णालयांवर बंधनकारक असते. पण तेथेही रुग्णालयांची मनमानी चालते. मोठी किंवा कॉर्पोरेट रुग्णालये सरकारी यंत्रणांना अजिबात दाद देत नाहीत. सरकारी नियमानुसार गरीब रुग्णांवर उपचार करण्याकरिता खाटा उपलब्ध करून देत नाहीत. सरकारमधील उच्चपदस्थांशी असलेल्या घनिष्ठ संबंधांतून या रुग्णालयांचे व्यवस्थापन मुजोरी करते, असे अनेकदा अनुभवास येते. चांगले उपचार मिळावेत म्हणून चार पैसे अधिक मोजून रुग्ण मोठ्या रुग्णालयांमध्ये उपचारासाठी दाखल होतात. पण याचा अर्थ रुग्णांकडून औषध खरेदीसाठी जादा पैसे उकळणे, असा होत नाही. रुग्णालयांमधील औषधांच्या दुकानांमध्ये कमी किमतीच्या इंजेक्शनसाठी अधिक रक्कम आकारली जाते. जादा किंमत आकारून रुग्णांच्या नातेवाईकांची फसवणूक केली जाते.

वास्तविक, औषध विक्रेत्यांवर नियंत्रण ठेवणे ही केंद्र सरकारची जबाबदारी. पण त्याच्या संबंधित विभागांकडून अशा औषध विक्रेत्यांवर कारवाई केल्याची उदाहरणे दुर्मीळ. या पार्श्वभूमीवर, ठरावीक दुकानांमधून औषधे खरेदी करण्याची सक्ती केल्याने रुग्णांच्या नातेवाईकांना कमी किमतीत औषधे खरेदी करण्याचा पर्याय राहत नाही, हे आता सर्वोच्च न्यायालयाने सुनावले ते चांगलेच. खरे तर रुग्णालयांमधील दुकानांमधून औषधे खरेदीची सक्ती नियमानुसार करता येत नाही. या नियमानुसार सरकारने आता रुग्णालयांवर नियंत्रण आणणे आवश्यक आहे. न्यायालयाने फटकारले म्हणून काही काळ कारवाईचे नाटक सरकारी यंत्रणांनी करू नये, ही अपेक्षा.

'नैतिकता आणि वैद्यकीय नोंदणी मंडळ' (एथिक्स ॲण्ड मेडिकल रजिस्ट्रेशन बोर्ड) या नावाची यंत्रणा २५ सप्टेंबर २०२० पासून सरकारने कार्यरत केली. पण औषधांसाठी रुग्णांना अवाच्या सव्वा पैसे आकारणे हा नैतिकतेचा भंग का मानू नये, हे सरकारला अद्याप ठरवता आले नसल्यानेच हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयापुढे आले. सरकारला कुणाची काळजी आहे- नफेखोर रुग्णालयांची की लोकांची, यासाठी या सुनावणीकडे लक्ष राहील.

# नेतृत्वाचा आदर्श : दशरथ गोप : व्यापक सामाजिक जाणिवेतून उमललेल नेतृत्व : दशरथ गोप

## जीवशिवभाव आपणची देव । केला अनुभव गुरुमुखे ॥

द गुरुमुखातून प्राप्त झालेले तत्व जेव्हा स्वतःच्या अनुभवात उतरते तेव्हाच ते जिवंत ज्ञान बनते म्हणून संत परंपरेत ऐकणे ही सुरुवात, समजणे ही पुढची पायरी, आणि अनुभवणे हा गाभा आहे, आणि म्हणूनच या तत्त्व आणि ज्ञानाला अनुभवाची जेव्हा झालर मिळते तेव्हा जीवनाच्या गाभाऱ्यातून उमलते ते नेतृत्व.

नेतृत्व आणि कर्तृत्व कुणाकडूनही उसने मिळत नाही. ते स्वतःच्या विचारांनी, कृतीने, संघर्षाने आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांनी निर्माण करावे लागते. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी त्यातून मार्ग काढत पुढे जाण्याची जिद्द, इतरांना सोबत घेऊन जाण्याची वृत्ती आणि एखाद्या संस्थेच्या विकासाला स्वतःच्या ध्येयाशी जोडण्याची क्षमता ज्या व्यक्तीमध्ये असते, तेच खरे नेतृत्व.

अशाच कर्तृत्ववान, धाडसी आणि दूरदृष्टी असलेल्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून देताना एकच नाव मनात येते—पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव माननीय श्री. दशरथ नारायण गोप.

प्रत्येक व्यक्तीला आपल्यातील सर्वोत्तम गुणांची जाणीव असणे आवश्यक असते. त्या गुणांचा योग्य उपयोग करून घेण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारी व्यक्ती आयुष्यात निश्चितच आपला ठसा उमटवते. अवघड गोष्ट आपल्या कल्पकतेने, नियोजनाने आणि कर्तृत्वाने सोपी करून दाखविणारा माणूसच खऱ्या अर्थाने यशाच्या शिखराकडे वाटचाल करतो. पूर्व भागापुरते मर्यादित न राहता आपल्या कार्याचा आणि विचारांचा ठसा संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात,राज्यात तसेच व्यापक शैक्षणिक क्षेत्रात उमटविणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे दशरथ नारायण गोप.

'दुसऱ्याच्या दारात सुखाचे झाड लावले की आनंदाची फुले आपल्या दारात पडतात,' या उक्तीचा प्रत्यय त्यांच्या कार्यातून सातत्याने येतो. ज्या पूर्व भागात आपण वाढलो, त्या भागातील कामगार, कष्टकरी आणि सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तन घडावे, त्यांच्या घरात नव्या तंत्रज्ञानाचे वारे वाहावेत आणि त्यांच्या मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी त्यांची धडपड सतत सुरू असते.

याचाच एक भाग म्हणजे पूर्व भागातील पहिली सीबीएससी ची "मातोश्री आशाताई अंबादास सरगम सेंट्रल स्कूल" ही शाळा सुरू करून एक प्रकारचा इतिहास घडविला. आणि अर्थात याचे श्रेय दशरथ गोप सरांना जाते. अनेक जुन्या शाळांच्या इमारतींचे पुनर्जीवन केले काही शाळा नव्याने उभारल्या. आजही अनेक शाखांना आधुनिकीकरणाचे रूप देण्याचे काम सुरूच आहे.

पूर्व भागातील गरीब, होतकरू आणि कष्टकरी वर्गातील विद्यार्थ्यांसाठी भक्कमपणे उभी असलेली पद्मशाली शिक्षण संस्था ही केवळ एक शिक्षणसंस्था नसून अनेक कुटुंबांच्या आशा-आकांक्षांचे केंद्र आहे. या संस्थेची जबाबदारी अत्यंत समर्थपणे पेलताना दशरथ गोप यांनी शिक्षणाला केवळ पुस्तकी ज्ञान न मानता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे प्रभावी माध्यम बनविण्याचा प्रयत्न केला आहे. आणि म्हणूनच "एकच ध्यास गुणवत्ता विकास" हे ध्येय घेऊन ते सध्या पुढे जात आहेत.

बालवर्गापासून ते वरिष्ठ महाविद्यालयापर्यंत ज्ञानाचा हा दीप अखंड तेवत ठेवण्याचे कार्य ते करत आहेत. बदलत्या काळानुसार शिक्षणपद्धतीत होणारे बदल, नवीन तंत्रज्ञान, आधुनिक शैक्षणिक साधने, विद्यार्थ्यांच्या बदलत्या गरजा आणि शिक्षणक्षेत्रासमोरील नवीन आव्हाने यांचा स्वीकार करून संस्थेला काळाबरोबर पुढे नेण्याची त्यांची भूमिका निश्चितच उल्लेखनीय आहे.

आज पद्मशाली शिक्षण संस्थेच्या तब्बल 23 शाखा सोलापूरमध्ये कार्यरत आहेत. या सर्व शाखांमध्ये विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि प्रशासन यांच्यामध्ये सुसूत्रता राखणे ही निश्चितच मोठी जबाबदारी आहे. एका कुटुंबातील सदस्यांना एकत्र ठेवणे कधी कधी आव्हानात्मक असते; मग 23 शाखांमध्ये कार्यरत असलेल्या हजारो विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांना एका शैक्षणिक ध्येयाभोवती एकत्रित ठेवणे म्हणजे निश्चितच मोठे आव्हान.

मात्र हे आव्हान स्वीकारून गेली अनेक वर्षे विविध परिस्थितींना,



अडचणींना आणि बदलत्या आव्हानांना सामोरे जात संस्थेला पुढे नेण्याचे काम दशरथ गोप यांनी केले आहे. त्यांच्या या प्रदीर्घ कार्यकाळात संघर्षाला घाबरून न जाता त्यातून मार्ग शोधण्याची वृत्ती, निर्णयक्षमता आणि संस्थेच्या हिताला प्राधान्य देण्याची भूमिका सातत्याने दिसून येते.

'विजेते वेगळ्या गोष्टी करत नाहीत; ते प्रत्येक गोष्ट वेगळेपणाने करतात.'

या विचाराचा प्रत्यय दशरथ गोप सरांच्या कार्यपद्धतीतून येतो. एखादे काम केवळ पूर्ण करणे आणि ते परिणामकारकपणे पूर्ण करणे यामध्ये मोठा फरक असतो. नियोजन, अंमलबजावणी, सातत्य आणि परिणाम यांचा समन्वय साधण्याची त्यांची कार्यपद्धती त्यांच्या नेतृत्वाची वेगळी ओळख निर्माण करते.

प्रत्येक शाखेतील भौतिक सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता, शिक्षकांचे प्रश्न, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रश्न, कार्यालयीन कामकाज, विद्यार्थीहित, पालकांशी संवाद, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध शैक्षणिक उपक्रम या सर्व बाबींमध्ये परिपूर्णता यावी यासाठी त्यांचे प्रयत्न सातत्याने सुरू असतात. एखाद्या संस्थेचा विकास केवळ इमारती आणि भौतिक सुविधांमुळे होत नाही, तर त्या संस्थेत काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आपलेपणाची भावना मिळाली पाहिजे, हा विचार त्यांच्या कार्यातून जाणवतो.

आज शिक्षणक्षेत्र झपाट्याने बदलत आहे. तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरापासून विद्यार्थ्यांच्या बदलत्या मानसिकतेपर्यंत, नवीन शैक्षणिक धोरणांपासून स्पर्धात्मक वातावरणापर्यंत अनेक आव्हाने शिक्षणसंस्थांसमोर आहेत. अशा परिस्थितीत समस्यांकडे अडथळे म्हणून न पाहता त्यातून संधी निर्माण करण्याची दृष्टी असलेले मार्गदर्शक म्हणून दशरथ गोप सरांची भूमिका महत्त्वाची ठरते.

त्यांच्या नेतृत्वाची आणखी एक विशेष बाब म्हणजे 'मी'पेक्षा ह्यआपण' या विचाराला दिलेले महत्त्व. संस्था ही एखाद्या एका व्यक्तीची नसते; ती शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि समाज यांच्या सामूहिक प्रयत्नातून घडते. या सामूहिक शक्तीला योग्य दिशा देणे आणि प्रत्येक घटकाला संस्थेच्या विकासप्रक्रियेत सहभागी करून घेणे ही त्यांच्या नेतृत्वाची ताकद आहे.

यशस्वी नेतृत्व म्हणजे केवळ निर्णय घेणे नव्हे, तर त्या निर्णयांची जबाबदारी स्वीकारणे होय. संकटाच्या काळात पुढे उभे राहणे, समस्यांचे निराकरण करणे, सहकाऱ्यांना विश्वास देणे आणि संस्थेच्या उद्दिष्टांपासून विचलित न होणे, या गुणांमुळे त्यांचे नेतृत्व अधिक अर्थपूर्ण बनते.

दशरथ गोप सरांच्या कार्याचा विचार करताना त्यांच्या सामाजिक बांधिलकीचाही आवर्जून उल्लेख करावा लागतो. शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील सामान्य आणि कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देणे म्हणजे एका पिढीचे भविष्य घडविणे होय. एका विद्यार्थ्याच्या हातात पुस्तक देणे म्हणजे केवळ त्याचे शिक्षण सुरू करणे नव्हे, तर त्याच्या संपूर्ण कुटुंबासाठी आशेचा किरण निर्माण करणे होय. हीच व्यापक सामाजिक जाणीव त्यांच्या कार्यामागे दिसून येते.

अत्यंत लहान वयात सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान देत त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. एका घरातील समस्या सोडवताना अनेकदा अडचणी येतात; मात्र 23 शाखांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक या विशाल शैक्षणिक परिवाराला सोबत घेऊन पुढे जाण्यासाठी लागणारी ऊर्जा, संयम, धैर्य आणि निर्णयक्षमता त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आहे.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते—पद हे मोठेपण देत नाही; तर त्या पदाला आपल्या कार्याने मोठेपण प्राप्त करून देणारी व्यक्ती महत्त्वाची असते. सचिव म्हणून मिळालेली जबाबदारी त्यांनी केवळ पद म्हणून स्वीकारलेली नाही, तर ती एक सामाजिक आणि शैक्षणिक बांधिलकी म्हणून स्वीकारली आहे.

त्यांच्या कार्याचा गौरव करताना केवळ त्यांनी काय मिळवले याचा विचार न करता त्यांनी किती जणांना पुढे जाण्याची संधी दिली, किती विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा दिली आणि संस्थेच्या विकासात किती लोकांना सहभागी करून घेतले, याचा विचार करणे अधिक महत्त्वाचे ठरते.

प्रत्येकाच्या वयाप्रमाणे आदर केला पाहिजे, मान दिला पाहिजे; परंतु एखाद्या व्यक्तीच्या कर्तृत्वाला सलाम करणे आणि त्या कर्तृत्वातून प्रेरणा घेणे ही त्याहून मोठी गोष्ट आहे. दशरथ गोप सरांचे कार्य हे अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्यातील सातत्य, ध्येयवेड, संघर्षशीलता, व्यवस्थापनकौशल्य, सामाजिक जाणीव आणि शिक्षणाविषयीची बांधिलकी या गुणांमधून अनेकांना प्रेरणा मिळू शकते. सरांचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे आजकाल शब्द पाळणारे लोक खूप कमी भेटतात मात्र "शब्दाला जागणारा माणूस" म्हणून दशरथ गोप साहेबांची ओळख निर्माण झाली आहे, अर्थात ओळख ही कृतीने निर्माण होत असते, दिलेल्या शब्द पाळण्याच्या या त्यांच्या कृतीने "शब्दाला पाळणारी व्यक्ती" अशी त्यांची प्रतिमा जनमानसात निर्माण झाली आहे.

आयुष्यात काही माणसे केवळ आपल्या पदामुळे मोठी नसतात, तर त्यांच्या माणुसकीमुळे मनात कायमची जागा निर्माण करतात. अशीच एक घटना.... माझ्या आजारपणाच्या कठीण काळात दशरथ गोप सरांनी माझ्या प्रकृतीची ज्या आत्मीयतेने काळजी घेतली, ती मी कधीही विसरू शकणार नाही.

मी आजारी असल्याचे समजल्यानंतर माझे रिपोर्ट मागवून घेणे, ते आपल्या डॉक्टरांना दाखवून त्यांच्याकडून सल्ला घेणे, मला वेळोवेळी योग्य मार्गदर्शन करणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'काळजी करू नका, सर्व ठीक होईल' असे म्हणत मला धीर देणे—या प्रत्येक गोष्टीतून आपले प्रेम आणि आपुलकी जाणवली. त्या काळात औषधांपेक्षा आपले दोन धीराचे शब्द आणि आपली आपुलकी माझ्यासाठी अधिक मोठा आधार ठरली. संस्थेत शिक्षक म्हणून काम करत असताना मला सचिव म्हणून आपला सन्मान आहेच; पण त्याहूनही अधिक, माणूस म्हणून आपल्याबद्दल माझ्या मनात कायम आदर आणि कृतज्ञता राहील.

सर, आपल्या या मायेचे आणि माणुसकीचे ऋण शब्दांत व्यक्त करणे शक्य नाही. आपल्या वाढदिवशी ईश्वरचरणी एकच प्रार्थना—आपण सदैव निरोगी, आनंदी आणि समाधानी राहावे; आपल्या हातून अशीच माणुसकीची सेवा घडत राहावी आणि आपल्या प्रेमाचा व आशीवार्दाचा हात सदैव आमच्यावर राहावा.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना शुभेच्छा देताना मनापासून एकच इच्छा व्यक्त करावीशी वाटते—त्यांच्या नेतृत्वाखाली पद्मशाली शिक्षण संस्थेचा शैक्षणिक विस्तार अधिक व्यापक व्हावा, विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना अधिक मोठे आकाश मिळावे आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत विकासाची ज्योत पोहोचत राहावी.

दशरथ गोप सरांचे आयुष्य म्हणजे संघर्षातून उभे राहण्याची, संधी निर्माण करण्याची आणि इतरांना सोबत घेऊन पुढे जाण्याची प्रेरणादायी वाटचाल आहे. त्यांच्या कार्याचा हा प्रवास असाच अखंड सुरू राहो आणि त्यांच्या कर्तृत्वाचा प्रकाश असंख्य विद्यार्थ्यांच्या भविष्याला उजळून टाको, हीच सदिच्छा.

माननीय श्री. दशरथ नारायण गोप सरांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

आपणास उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, यश, समाधान आणि समाजसेवेची अखंड ऊर्जा लाभो. आपल्या नेतृत्वातून अनेक पिढ्यांचे भविष्य घडत राहो आणि आपल्या कार्याचा सुगंध अधिकाधिक दूरवर पसरत राहो, हीच मनःपूर्वक शुभेच्छा!

**– अभिज भानप**
(सहशिक्षक)
पद्मशाली शिक्षण संस्था संचालित
मातोश्री जनाबाई जनार्दन बिटला
प्रशाला, विडी घरकुल, सोलापूर

## महाराष्ट्रातील जलसंधारणासाठी वैज्ञानिक नियोजनाची गरज- खा.धैर्यशील मोहिते पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सन २०२६ मधील एल निनो परिस्थिती, पर्जन्यमानातील अनिश्चितता आणि आगामी काळातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता, महाराष्ट्रातील जलसंधारण व भूजल पुनर्भरणाच्या कामांचे शास्त्रशुद्ध आणि दीर्घकालीन नियोजन होणे आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी पत्र



लिहून महाराष्ट्रातील जलसंधारण व भूजल पुनर्भरणाच्या कामांसाठी केंद्रीय भूजल मंडळाच्या (CGWB) वैज्ञानिक आराखड्याचा आधार घेऊन सूक्ष्म नियोजन करण्याची मागणी केली आहे.

तसेच खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी सोलापूर व सातारा जिल्हाधिकाऱ्यांनाही पत्र देऊन, जिल्ह्यातील जलसंधारण व भूजल पुनर्भरणाच्या कामांचे वैज्ञानिक पद्धतीने नियोजन करून आगामी पाणीटंचाईच्या संभाव्य संकटावर प्रभावी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

## सेवा संकल्प अभियानतर्गत जागतिक जेष्ठ नागरिक दिवस साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पंचायत समिती दक्षिण सोलापूर कार्यालयात सेवा संकल्प अभियानातर्गत गट विकास अधिकारी मनोज राऊत यांचे शुभहस्ते १ ऑक्टोंबर हा दिवस जेष्ठ नागरिक दिवस याप्रसंगी विशेष कार्य करत असलेल्या सेवा निवृत्त अब्दुल मज्जीद महमंद शेख, शेकाप्पा सिद्राम गाजूल,राजेश देशपांडे, अरुण क्षीरसागर, लतिका लोंढे, नुतन पिसे, राजेंद्र सोनकांबळे, अविनाश भोसले, अक्रम पठाण, पांडुरंग कविटकर, बापू करजखेडे, रमेश सोनके, नागनाथ धोत्रे, सुभाष फुलारी, शंकर जाधव, बाधशहा मुल्ला, रमेश गायकवाड,यनमलप्पा



चिट्टे, भिमाशंकर म्हेत्रे या जेष्ठांचा सन्मान करणेत आला.

यात्रसंगी प्रशासन अधिकारी अविनाश गोडसे कनिष्ट प्रशासन अधिकारी मनिषा वास्ते, विस्तार अधिकारी ज्योतीराम भोसले, सदाशिव कोळी, शिवानंद सोलापूरे, सुरेश राठोड, कनिष्ट लेखाधिकारी अंजू पाटील, संदिप घोडके, सुधीर फुलारी, मनोहर राठोड, रुपाली मोरे, जिलानी अन्सारी, रामकृष्ण पाटील, विनायक कुंचपोर, स्नेहा जाधव,शहानवाज शेख,शिवानंद नागूर, भिमाशंकर कोळी, पंडीत व्हनमाने, अरुणा रांजणे गविअ मनोज राऊत यांनी सर्व जेष्ठ नागरिक यांना आरोग्यदायी व आनंदीमय जीवन जावो अशी जेष्ठता दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

## पैसे दुप्पट करण्याचे आमिष दाखवून ६.८ लाखांची लूट

### तोतया पोलिसांसह आंतरराज्य टोळीतील ४ जणांना बेड्या

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पैसे दुप्पट करून देण्याचे आमिष दाखवून आणि स्वतः पोलीस असल्याचे भासवून नागरिकाला मारहाण करत लाखो रुपयांची रोकड लुटणाऱ्या टोळीचा सोलापूर शहर गुन्हे शाखेने पदार्फाश केला आहे. पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत कर्नाटक आणि सोलापूर येथील ४ सराईत आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून ५ लाख ५० हजार रुपयांची रोकड, स्विफ्ट कार, मोटारसायकल आणि ५ मोबाईल असा एकूण १४ लाख ३४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



**मोदी बोगद्याजवळ तोतया पोलिसांनी घातला होता दरोडा**

२७ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री १०:३० वाजेच्या सुमारास आरोपींनी फियार्दीस पैसे दुप्पट करून देण्याचे आमिष दाखवले. त्यासाठी फियार्दीला मोदी बोगदा येथील स्मशानभूमीजवळील सार्वजनिक रस्त्यावर बोलावून घेण्यात आले.

त्या ठिकाणी आधीपासून उपस्थित असलेल्या ४ इसमांव्यतिरिक्त इतर ३ साथीदार तेथे पोहोचले आणि त्यांनी आपण पोलीस असल्याचे भासवले. त्यानंतर फियार्दीस बेदम मारहाण करून त्यांच्याकडील रोख ६ लाख ८० हजार रुपये जबरदस्तीने हिसकावून आरोपी पसार झाले होते. याप्रकरणी सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ८२२/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३१०(२), २०४, २०५, ११५(२), ३५१(२), ३५२ अन्वये दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

**वांगी रोडवर सापळा रचून आवळल्या मुसक्या**

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हे शाखेच्या पथकांनी आरोपींचा शोध सुरू केला होता. २८ सप्टेंबर २०२६ रोजी गुन्हे शाखेचे पोलीस हवालदार (ब.नं. ४१६) हाजीमलंग शेख यांना गोपनीय बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, चार संशयित इसम वांगी रोडवरील मोकळ्या मैदानात एका पांढऱ्या स्विफ्ट कार व दुचाकीसह थांबले आहेत.

माहिती मिळताच सपोनि दत्तात्रय काळे व त्यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेऊन संशयितांना चहूबाजूंनी घेराव घालत शिताफीने ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली.

**अटक करण्यात आलेल्या ४ आरोपींची नावे**

१. संतोष राजाप्पा पाटील (वय ४४, रा. ९-१०-६५, संगमेश्वर निलय, मनोली रोड, रामपुरे कॉलनी, बीदर, राज्य कर्नाटक)

२. महिबूब युसूफ विजापुरे (रा. महिबूब सुभानी दर्ग्याजवळ, डोणगाव रोड, सोलापूर)

३. मल्लिकार्जुन यल्लप्पा शिवल्ली (वय ४२, रा. राणीबेन्नूर, जि. हवेरी, राज्य कर्नाटक)

४. मंजुनाथ कल्याणराव निडोदे (वय ३५, रा. हंडरे रोड, भालकी, जि. बीदर, राज्य कर्नाटक)

## मोहोळ मतदारसंघातील ग्रामीण विकासासाठी भरीव निधी द्या



**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागाच्या विकासाला गती देण्यासाठी ग्रामविकास विभागाच्या विविध योजनांतर्गत भरीव निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी मोहोळचे आमदार राजू खरे यांनी गृह, महसूल, ग्रामविकास व पंचायत राज राज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे केली.

मोहोळ तालुक्यातील १०४, उत्तर सोलापूर तालुक्यातील २४ आणि पंढरपूर तालुक्यातील १७, अशी एकूण १४५ गावे समाविष्ट आहेत. या गावांमध्ये रस्ते, गावांतर्गत रस्ते तसेच विविध मूलभूत सुविधांची अनेक कामे प्रलंबित आहेत. ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या विविध योजनांच्या माध्यमातून १४५ गावांतील आवश्यक विकासकामांना प्राधान्य देऊन निधी उपलब्ध करून द्यावा, गावांतर्गत रस्त्यांची कामे मार्गी लावावीत आणि ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी शासनस्तरावर सहकार्य करावे, अशी विनंतीही त्यांनी केली. मतदारसंघातील ग्रामीण भागातील विकासकामांना निधी उपलब्ध करून देण्यासंदर्भात आमदार खरे यांनी राज्यमंत्री कदम यांच्यासमोर विविध मागण्या मांडल्या.

दरम्यान, राज्यमंत्री योगेश कदम यांनी मतदारसंघातील ग्रामीण भागाची परिस्थिती तसेच मांडण्यात आलेल्या विविध विकासकामांच्या मागण्या जाणून घेतल्या. आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मकता दर्शवल्याचे आ. खरे यांनी सांगितले.

### वात्रटिका

**कुठे जाणार आहोत..**

बदलून गेली दुनिया
पुढेही बदलणार आहे...
ती लोकांना की लोक
तिला कुठे घेऊन जाणार...
त्या कोपऱ्यात तंटा आहे
इकडेही डोंब उसळला...
प्रेमाचा शेजार कमी झाला
निसर्गही धग घेऊन कोसळला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# ‘निरोगी गाव’ निर्मितीसाठी सर्व विभागांचा समन्वय आवश्यक - डॉ. सतीश कोपुरवाड

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** ‘प्रजा निरोगी, तर राज्य सशक्त’ आणि ‘सेवा संकल्प अभियान’ या संकल्पनांना केंद्रस्थानी ठेवून गावपातळीवर आरोग्यविषयक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने ‘माझं गाव आरोग्य संपन्न गाव’ अभियानांतर्गत विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.




जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांच्या मार्गदर्शनाखाली, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन व ग्रामपंचायत) सूर्यकांत भुजबळ आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल विकास) प्रसाद मिरकले यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपुरवाड यांच्या नेतृत्वाखाली ही कार्यशाळा घेण्यात आली.

**प्रतिबंधात्मक आरोग्याला प्राधान्य द्यावे**

मार्गदर्शन करताना डॉ. सतीश कोपुरवाड यांनी गावातील प्रत्येक नागरिकाचे आरोग्य हे ‘आरोग्य संपन्न गाव’ निर्मितीचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगितले. आजार झाल्यानंतर उपचार करण्याबरोबरच आजार प्रतिबंध, आरोग्य संवर्धन, नियमित आरोग्य तपासणी आणि आरोग्यविषयक जनजागृती यावर विशेष भर देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

गावातील आरोग्यविषयक गरजा ओळखून स्थानिक पातळीवर कृती आराखडा तयार करणे, उपलब्ध आरोग्य सुविधांचा प्रभावी वापर करणे तसेच पात्र नागरिकांपर्यंत शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ पोहोचविणे आवश्यक आहे. ‘निरोगी गाव’ही संकल्पना केवळ आरोग्य विभागाच्या प्रयत्नातून साध्य होणार नसून ग्रामपंचायत, शिक्षण, पाणीपुरवठा व स्वच्छता, महिला व बाल विकास तसेच इतर संबंधित विभागांच्या समन्वित प्रयत्नांची आवश्यकता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

**अभियानाच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन**

कार्यशाळेत ‘माझं गाव आरोग्य संपन्न गाव’ अभियानाचे पुणे विभागीय समन्वयक अमित शर्मा आणि गणेश ननवरे यांनी अभियानाची अंमलबजावणी, गावपातळीवरील नियोजन आणि विविध उपक्रमांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. हर्षल जाधव यांनी शासन परिपत्रकातील तरतुदी, अभियानाची कार्यपद्धती तसेच अभियानांतर्गत गावांना देण्यात येणाऱ्या पुरस्कारासाठी विचारात घेतले जाणारे विविध आरोग्यविषयक निर्देशांक याबाबत माहिती दिली.

**ग्रामस्तरावर सर्वसमावेशक आरोग्य कृती आराखडा**

कार्यशाळेत ग्रामस्तरावर नागरिकांच्या आरोग्याला केंद्रस्थानी ठेवून सर्वसमावेशक आरोग्य कृती आराखडा तयार करण्यावर भर देण्यात आला. संसर्गजन्य व जीवनशैलीशी संबंधित आजारांचे प्रतिबंध, नियमित आरोग्य तपासणी, आरोग्य नोंदींचे अद्ययावतीकरण आणि उपलब्ध आरोग्य सुविधांचा नियमित आढावा घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

महिला, बालक आणि ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यविषयक गरजांकडे विशेष लक्ष देण्यासोबतच स्वच्छता, सुरक्षित पिण्याचे पाणी, पोषण, शिक्षण आणि आरोग्य या घटकांचा परस्पर समन्वय साधण्यावर भर देण्यात आला. आरोग्यविषयक जनजागृतीसोबत नागरिकांमध्ये सकारात्मक वर्तनबदल आणि जनसहभाग वाढविण्यासाठी प्रभावी संवाद साधण्याचे आवाहन करण्यात आले.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचत आहे की नाही, याचे नियमित मूल्यमापन करणे तसेच निर्धारित आरोग्य निर्देशांकांच्या आधारे गावांच्या कामगिरीचे परीक्षण करण्याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

**विविध विभागांचा सहभाग**

कार्यशाळेस गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, तालुका विस्तार अधिकारी, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका तसेच जिल्हा परिषदेच्या महिला व बाल विकास, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण, पाणीपुरवठा व स्वच्छता, आरोग्य आदी विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

गावातील नागरिकांचे आरोग्य, प्रभावी जनसहभाग आणि विविध विभागांमधील समन्वय यांच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यात ‘आरोग्य संपन्न गाव’ निर्माण करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याचा निर्धार कार्यशाळेत करण्यात आला.

‘निरोगी नागरिक - आरोग्य संपन्न गाव - सशक्त सोलापूर’ हा संदेश या कार्यशाळेतून देण्यात आला.

# विधान परीषद पदवीधर निवडणूकीत असे करा मतदान

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** भारत निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या विधानपरिषद निवडणुकीची मतदान पद्धती आणि आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या अन्य सार्वत्रिक निवडणुकातील मतदानाची पद्धती यात मूलभूत फरक आहे. विधानपरिषद निवडणूकीचे मतदान हे मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावापुढे पसंतीक्रम नोंदवून घेण्यात येते. जितके उमेदवार निवडणूक लढवित असतील अशा सर्वांपुढे पसंतीक्रम नोंदविता येतो. मतदानाच्या या वेगळ्या पद्धतीमुळे मतदारांनी आणि विशेषतः प्रथमच मतदान करणाऱ्यांनी ही पद्धत जाणून योग्यरितीने मतदान करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले आहे.

**असे करा मतदान:**

मतदान करण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने मतपत्रिकेबरोबर पुरवलेले जांभळ्या रंगाचे स्केच पेनच वापरावे. अन्य कोणतेही पेन, पेन्सिल, बॉलपॉईन्ट पेन किंवा अन्य कोणतेही लेखनाचे साधन मतदानासाठी वापरु नये. असे केल्यास तुमची मतपत्रिका अवैध ठरेल.

उमेदवाराच्या नावाच्या स्तंभासमोर पसंतीक्रम म्हणून असलेल्या स्तंभामध्ये तुम्ही प्रथम पसंतीचा उमेदवार म्हणून निवडलेल्या उमेदवाराच्या नावासमोर १ असा आकडा लिहून मतदान करा. हा १ हा आकडा फक्त एकाच उमेदवाराच्या नावासमोर द्यावा. एकापेक्षा अधिक उमेदवारांची निवड करावयाची असली तरीदेखील १ हा आकडा फक्त एकाच उमेदवाराच्या नावासमोर घाला.

निवडून द्यावयाच्या उमेदवारांची संख्या विचारात न घेता जेवढे उमेदवार निवडणूक लढवत असतील तेवढे पसंतीक्रम तुम्हाला देता येतील. उदाहरणार्थ, पाच उमेदवार निवडून द्यावयाचे असतील तरीही तुम्हाला तुमच्या निवडीच्या पसंतीक्रमाने उमेदवारांच्या नावासमोर १ ते ५ असे आकडे घालता येतील. उर्वरीत उमेदवारांबाबतचा तुमचा पुढील पसंतीक्रम, अशा उमेदवारांच्या नावासमोर असलेल्या पसंतीक्रम या स्तंभामध्ये तुमच्या पसंतीक्रमानुसार २, ३, ४ इत्यादी आकडे घालून दर्शवा.

कोणत्याही उमेदवाराच्या नावासमोर आपण फक्त एकच आकडा घातलेला आहे याची खात्री करून घ्यावी. तसेच तोच आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर घातलेला नाही याची देखील खात्री करुन घ्यावी. पसंतीक्रम फक्त १, २, ३ इत्यादी आकड्यांमध्येच दर्शवावा. एक, दोन, तीन इत्यादी शब्दांमध्ये दर्शवू नये. पसंतीक्रमाचे आकडे भारतीय अंकाच्या 1, 2, 3 इत्यादींसारख्या आंतरराष्ट्रीय रुपात किंवा क कक्ष कक्कइत्यादींसारख्या रोमन रुपात किंवा १, २, ३ अशा देवनागरी रुपात किंवा संविधानाच्या अनुसूची आठमधील मान्यता दिलेल्या कोणत्याही एका भारतीय भाषेमध्ये वापरण्यात येणाऱ्या रुपामध्ये चिन्हांकित करता येतील.

मतपत्रिकेवर मतदाराने आपले नाव, आद्याक्षरे किंवा अन्य शब्द लिहू नयेत किंवा स्वाक्षरी करु नये. तसेच आपल्या अंगठ्याचा ठसा देखील उमटवू नये. असे केल्यास आपली मतत्रिका अवैध ठरेल.

पसंतीक्रम दर्शविण्यासाठी तुमच्या निवडीच्या उमेदवाराच्या नावासमोर √ किंवा X अशी खूण करणे पुरेसे होणार नाही. अशा मतपत्रिका बाद करण्यात येतील. पसंतीक्रम फक्त आकड्यांमध्येच दर्शवावा.

आपली मतपत्रिका वैध ठरण्यासाठी एकूण उमेदवारांपैकी एका उमेदवारासमोर १ हा आकडा लिहून तुमची पहिली पसंती दर्शवणे आवश्यक आहे. इतर पसंतीक्रम देणे ऐच्छिक आहेत. म्हणजेच इच्छेनुसार दुसरी किंवा पुढील पसंती दर्शवावी अथवा दर्शवू नये.

**अशा मतपत्रिका अवैध ठरतील:**

१ हा आकडा घातलेला नसल्यास. १ हा आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर घातलेला असल्यास. १ हा आकडा, तो कोणत्या उमेदवाराला देण्यासाठी घातलेला आहे याबाबत शंका निर्माण होईल अशाप्रकारे घातलेला असेल. एकाच उमेदवाराच्या नावासमोर १ आणि त्याबरोबर २, ३ इत्यादी आकडे देखील घातलेले असतील. पसंतीक्रम आकड्याऐवजी शब्दांमध्ये दर्शवलेला असेल. मतदाराची ओळख पटू शकेल अशी कोणतीही खूण किंवा लेखन असले, आणि असे आकडे घालण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने दिलेल्या जांभळ्या रंगाच्या स्केच पेन व्यतिरिक्त अन्य साधनाने कोणताही आकडा घातलेला असेल, तरी अशी मतपत्रिका अवैध ठरेल.

# सोलापूर जिल्ह्यात ‘एक तास गावासाठी’ स्वच्छेतेच्या कार्यात राबले हजारो हात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात स्वच्छता ही सेवा उपक्रमा अंतर्गत एक तास गावा साठी श्रमदान या महास्वच्छता मोहिमेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.



जिल्ह्यातील ७३० पेक्षा अधिक गावांत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. गावातील प्लास्टिक, अस्वच्छ ठिकाणे. मंदिराचा परिसर, शाळा व अंगणवाडी चा परिसर, गावातील सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करणेत आली.

मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायती मध्ये चांगला प्रतिसाद मिळाला. या गावांत दर रविवारी सामूहिक स्वच्छता मोहीम राबविण्याची सवय ग्रामस्थांना झाली आहे. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दिपक वैद्य, उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, विषय समित्यांचे सभापती, पंचायत समितीचे सभापती, जिल्हा परिषद सदस्य यांचे मार्गदर्शना खाली सेवा संकल्प अभियानाचा एक भाग म्हणून स्वच्छता ही सेवा हा उपक्रम करणेत आलेला आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव यांनी गटविकास अधिकारी यांचे सहकार्याने नियोजन केले.

**महात्मा गांधी जयंतीदिनी देखील स्वच्छता मोहीम..!**
**- सिईओ कुशल जैन**

सोलापूर जिल्ह्यात १ सप्टेंबर बरोबरच २ ऑक्टोंबर रोजी देखील महा स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. उद्या शुक्रवारी उर्वरित गावांत ही मोहिम सुरू राहणार आहे. गावाची स्वच्छतेसाठी एक तास दिले बद्दल जिल्ह्यातील ग्रामस्थांचे सिईओ कुशल जैन यांनी आभार व्यक्त करीत असल्याचे सांगितले. सेवा संकल्प अभियानास या उपक्रमामुळे गती मिळाली आहे. स्वच्छता ही सेवा या उपक्रमात अनेक तरुण सहभागी होत आहेत ही आनंदाची बाब आहे. पहिले टप्प्यात उत्तर सोलापूर तालुक्यातील बिबिदारफळ व मार्डी येथील युवकांचा सन्मान करणेत येणार आहे. या गावामुळे जिल्ह्यातील अन्य ग्रामपंचायतींनी प्रेरणा घ्यावी. हा या पाठी मागचा उद्देश्य आहे. असेही सिईओ जैन यांनी सांगितले.

**सार्वजनिक स्वच्छतेबरोबर मनाची स्वच्छता..!**

ज्या ज्या गावांत दर रविवारी स्वच्छता मोहीम राबविली जाते त्या गावातील तंटे व वाद कमी झाले आहेत. उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी, बीबीदारफळ, अकोलेकाटी, सांगोला तालुक्यातील चिणके, अक्कलकोट तालुक्यातील सांगवी बुद्रूक, मंगळवेढा तालुक्यातील भाळवणी, करमाळा तालुक्यातील कोर्टी या ग्रामपंचायती मध्ये दर रविवारी स्वच्छता मोहीम घेतली जात आहे.

**सार्वजनिक परिसर चकाचक..!**

सेवा संकल्प अभियानामुळे विविध विभाग या अभियानात एकवटले आहेत. ग्रामपंचायत स्तरावर सार्वजनिक ठिकाणे, शाळा परिसर, रस्ते, चौक, पर्यटन ठिकाणे, मंदिरे,तीर्थक्षेत्रे व प्रार्थना स्थळे व नदी परिसर, जलस्रोत परिसर तसेच इतर आवश्यक ठिकाणी सामूहिक श्रमदान व स्वच्छता मोहीम राबविण्यात आलेने परिसर चकाचक झाला आहे. परिसरातील प्लास्टिक संकलन देखील करणेत आले आहे. बार्शी तालुक्यातील सौंदरे ग्रामस्थांनी संपुर्ण गाव स्वच्छ केला आहे. चार ट्राली कचरा संकलित केला आहे. अक्कलकोट तालुक्यातील घोळसगाव येथे तीन तास श्रमदान सुरू होते.

**नावासाठी नाही..,फक्त गावांसाठी बिबिदारफळ चा ३८ वा स्वच्छता दिवस..!**

उत्तर सोलापूर तालुक्यातील बिबीदारफळ येथील ५४ पेक्षा अधिक ग्रामस्थ गेल्या ३८ आठवडे स्वच्छता करीत आहेत. एक रविवार गावांसाठी हा उपक्रम जिल्ह्यात प्रेरणादायी ठरत आहे. नावासाठी नाही..,फक्त गावांसाठी हे टायटल राज्यात फेमस झाले आहे. दर रविवारी हा उपक्रम राबविला जातो. सेवा संकल्प अभियानात या उपक्रम राज्यात एका उंचीवर गेला आहे. अनेक गावांत बिबिदारफळ चा आदर्श घेत आहेत. सर्वसामान्य कुटुंबातील तरुणांनी एकत्र येऊन हा उपक्रम राबविला आहे. सामज माध्यमांवर लाखो लोक हा उपक्रम पाहत आहेत.

# मोहोळ शहराच्या विकासासाठी 10 कोटींच्या निधीची मागणी

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पालखी रोड स्टेशन या प्रमुख रस्त्याच्या विकासासाठी १० कोटी रुपयांचा निधी तसेच शहरातील विविध विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबतचे निवेदन मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोहोळ शहराच्या विकासकामांसाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ठोस आदेश दिल्याची माहिती देण्यात आली.



शिवसेना ओबीसी महाराष्ट्र राज्य प्रमुख रमेश बारसकर यांच्या नेतृत्वाखाली तसेच शिवसेना सोलापूर जिल्हाप्रमुख चरणराज चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोळ शहरातील लोकनियुक्त नगराध्यक्षा कु. सिद्धीताई वस्त्रे यांच्या उपस्थितीत हे निवेदन देण्यात आले.

मोहोळ शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पालखी रोड स्टेशन हा महत्त्वाचा मार्ग असून, या रस्त्याच्या विकासासाठी १० कोटी रुपयांच्या निधीची मागणी करण्यात आली. यासोबतच मोहोळ शहरातील विविध विकासकामांना गती देण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोहोळ शहरातील विकासकामांबाबत सकारात्मक भूमिका घेत लवकरात लवकर निधीची पूर्तता करण्याच्या दृष्टीने संबंधित प्रशासनाला आवश्यक निर्देश देण्याचे आश्वासन दिले.

या शिष्टमंडळात ओबीसी महाराष्ट्र राज्य प्रमुख रमेश बारसकर, जिल्हाप्रमुख चरणराज चवरे, नगराध्यक्षा कु. सिद्धीताई वस्त्रे यांच्यासह शहरप्रमुख अतुल क्षीरसागर, नगरसेवक चंद्रकांत गोडसे, नगरसेवक आबासाहेब बरकडे, नगरसेवक सागर अष्ठुळ, नगरसेवक दौलतराव देशमुख, नगरसेवक अजय कुर्डे, नगरसेवक लखन कोळी, किशोर वस्त्रे, गणेश गावडे, योगेश गायकवाड आदी उपस्थित होते.

# कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्वच्छता रॅली




**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** स्वच्छ भारत सुंदर भारत, प्लास्टिकचा वापर करू नका, कचरा रस्त्यावर टाकू नका, सार्वजनिक ठिकाणी घाण करू नका, घरात छतावर पाणी साचू देऊ नका, कचरा पेटीत कचरा टाका अशा घोषणा देत कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी स्वच्छता रॅली काढली.

महात्मा गांधींच्या स्वच्छतेच्या विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड देण्यासाठी कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने ही स्वच्छता रॅली आयोजित केली होती.

महाविद्यालय ते हन्नूर चौक, एसटी स्टँड, कारंजा चौक, बाजारपेठ मार्गे श्री स्वामी समर्थ मंदिरापर्यंत स्वच्छता रॅली काढण्यात आली. ठीक ठिकाणी विद्यार्थ्यांनी नागरिकांना प्रबोधन केले.

विद्यार्थ्यांनी परिसरातील कचरा प्लास्टिक व घनकचरा गोळा करून तो कचरापेटीत टाकला, रॅलीचे नियोजन एनएसएस कार्यक्रमाधिकारी प्राध्यापिका डॉ शितल झिंगाडे भस्मे यांनी केले. प्राध्यापक सौरभ भस्मे डॉ बाळासाहेब पाटील, प्राध्यापिका प्राची गणेचारी, सौंदर्या शास्त्री, विद्याश्री बिराजदार, ऐश्वर्या तारापुरे, जनाबाई चौधरी रॅलीमध्ये सहभागी झाले होते.

संस्थेचे अध्यक्ष विद्यमान आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, पुनम कोकळगी, रूपाली शहा, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी यांनी उपक्रमाबद्दल एन एस एस स्वयंसेवकाचे अभिनंदन केले.

**विद्यार्थ्यांच्या लक्षवेधी घोषणा**

रस्त्यावर कचरा टाकू नका, ओला व सुका कचरा वेगळा करा, सार्वजनिक ठिकाणी थुंकू नये, प्लास्टिकचा अनावश्यक वापर करू नका अशा लक्षवेधी घोषणा विद्यार्थ्यांनी दिल्या, त्यामुळे संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता, नागरिकांनी देखील विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

**आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.**
**मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर**
**संपर्क - 9422602337, 8317212037**

## Classified - छोटी जाहीरात

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**आडवे शब्द :** १) भारतीय क्रिकेट टीममधून निवृत्त झालेला एक डावखुरा फलंदाज ६) नशीब (हिंदीत) ९) गाण्यातील लय, एक जुना ग्रामीण खेळ-** पारंब्या १०) बारीकसारीक १२) एक म्हण-** तो कान पिळी१४) दुसऱ्याच्या मनातील ओळखणारा १६) भाकरी थापण्याचे मोठे पात्र १८) शहर २१) मुंबई लगतचा एक जिल्हा २३) लहान बाळाला टोचतात ती २४) उत्सवाचा दिवस २५) स्वार्थ, हेतू २७) उन्हाळ्यातील एक महिना २८) कौरवांची आई ३०) वाईट सवय, तल उलट लिहा ३१) भाजप नेते -*** मुनगंटीवार ३२) अकरा (हिंदीत) ३४) पाकचे एक माजी पंतप्रधान-*** शरीफ ३६) पाण्याचे बाष्परूप ३७) दृष्टी ३८) रांग ४०) छ. शिवरायांच्या राजधानीचा किल्ला ४२) ऋतिक रोशन अभिनीत एक चित्रपट-** - अकबर ४४) आईची बहीण ४६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ४९) तलाव ५०) केळांचा समूह ५१) बेसनाच्या पिठाच्या बुंदीपासून बनवितात तो गोलाकार गोड पदार्थ ५२) भारताचा एक माजी विकेटकिपर-*** मोंगिया

**उभे शब्द :** १) भारतीय क्रिकेटमधील एक माजी फलंदाज, इरफान पठाणचा भाऊ २) आशिर्वाद, नवरा मुलगा ३) पाणी, उदक ४) राजाचे दरबारातील बसण्याचे आसन ५) बंदूक (इंग्रजीत) ६) पाणी पिण्याची तीव्र इच्छा ७) सोने ८) चिखल, राडा ११) एकरूप, तल्लीन १३) शिजवलेला तांदूळ १५) राहुल गांधी यांचे चुलतबंधू १७) कोकणातील भाजपचे आमदार-नितेश ** १९) जहाज २०) स्वामी तिन्ही जगाचा आईविना *** २२) चार आणि तीन मिळून होणारी संख्या २५) शिवसेनेचे महाराष्ट्राचे एक माजी मुख्यमंत्री २६) जोराची आरोळी (हिंदीत)२९) कर्नाटकातील एक जिल्हा ३१) अहमदनगरचे खासदार-*** विखे ३२) ज्ञान (हिंदीत) ३३) जर उलट लिहा ३५) वायू, पवन ३९) राष्ट्रवादीचे निवडणूक चिन्ह ४१) हनुमानाच्या हातातील शस्त्र ४३) ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे जावई-सदानंद ** ४४) मराठी वर्षातील एक महिना ४५) पारंब्या असलेला वृक्ष ४६) फळ्यावर लिहिण्यासाठी हा वापरतात ४७) पत्र (हिंदीत) ४८) एक हजार कि.ग्रॅ.- एक ** ४९) शरीर, काया

## सुडोकु - 67

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 6 | | | | 8 | | 2 |
| 7 | | | 4 | 2 | 8 | | 9 | 6 |
| 2 | 1 | | | 3 | | 7 | | 5 |
| | 3 | 1 | | | | 9 | 8 | |
| | | | 1 | | | | | 7 |
| 8 | 2 | | 9 | 5 | | | | 3 |
| 3 | | | | | 2 | | 6 | |
| | 8 | 5 | | 7 | 6 | | | |
| 9 | | 2 | 5 | | 1 | 3 | | 8 |

# एस आय आर.विरोधात सोलापूरात एल्गार !

## ज्ञानेश कुमार यांच्या पुतळ्याचे दहन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सदोष व अनेक त्रुटींनी युक्त असलेली विशेष सखोल मतदार पुनरावलोकन (SIR) प्रक्रिया तात्काळ रद्द करा, चुकीच्या पद्धतीने वगळण्यात आलेल्या पात्र मतदारांचे मतदानाचे अधिकार पुनर्स्थापित करा आणि निवडणूक आयोगाची विश्वासार्हता व स्वायत्तता पुनर्स्थापित करा, या मागण्यांसाठी भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)च्या वतीने बुधवारी, ३० सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, पूनम गेट येथे तीव्र धरणे आंदोलन करण्यात आले.

'मतदार यादीतून नावे वगळून लोकशाही कमकुवत करण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही; प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा अधिकार अबाधित राहिलाच पाहिजे,'असा आक्रमक इशारा यावेळी आंदोलकांनी दिला.

पक्षाचे जिल्हा सचिव कॉ. युसुफ शेख मेजर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू झाले. आंदोलकांनी निषेधाचे फलक झळकावत आणि जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. त्यानंतर कार्यकर्त्यांनी गनिमी काव्याने निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा प्रतीकात्मक पुतळा आंदोलनस्थळी आणला आणि त्याचे दहन केले. अचानक झालेल्या या कृतीमुळे पोलिसांची चांगलीच तारांबळ उडाली.

आंदोलनादरम्यान 'SIR प्रक्रिया रद्द करा', 'वगळलेल्या पात्र मतदारांची नावे तातडीने मतदार यादीत समाविष्ट करा', 'मतदानाचा अधिकार अबाधित ठेवा', 'निवडणूक आयोगाची विश्वासार्हता पुनर्स्थापित करा; अशा घोषणांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर दुमदुमून गेला.

आंदोलनानंतर शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. निवेदनाद्वारे SIR प्रक्रियेतील त्रुटी दूर करून पात्र मतदारांचे अधिकार सुरक्षित करण्याची मागणी करण्यात आली.

प्रमुख मागण्या रक्क्ष प्रक्रिया तात्काळ थांबवावी व सदोष प्रक्रिया रद्द करावी, रक्क्षप्रक्रियेत चुकीच्या पद्धतीने वगळण्यात आलेल्या सर्व पात्र मतदारांची नावे तातडीने पुनर्स्थापित करावीत, मतदार यादीच्या पुनरावलोकनासाठी किमान दोन महिन्यांची मुदत द्यावी,मतदार यादी तयार करण्याची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक, विकेंद्रित आणि लोकशाही पद्धतीने राबवावी, निवडणूक आयोगाचे स्वतंत्र, निष्पक्ष आणि लोकशाही पद्धतीचे कामकाज पुनर्स्थापित करावे, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवावे, अशी मागणी करण्यात आली, निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीची विद्यमान पद्धत बदलून सर्वोच्च न्यायालयाने सुचविलेल्या धर्तीवर पंतप्रधान, लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि भारताचे सरन्यायाधीश यांचा समावेश असलेली नियुक्ती व्यवस्था करावी.

'मतदार हा लोकशाहीचा केंद्रबिंदू आहे. पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीतून चुकीच्या पद्धतीने वगळले जाणे म्हणजे त्याच्या घटनात्मक मतदानाच्या अधिकारावर थेट परिणाम होय. त्यामुळे SIR प्रक्रिया पारदर्शक होईपर्यंत संघर्ष सुरूच राहील,' असा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला.

# सोलापूर शहरात लवकरच नवीन ई-बस धावणार



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने प्रस्तावित नवीन ई-बस सेवेसंदर्भात महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली महापौर कार्यालयात बैठक घेण्यात आली.

या बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, सभागृहनेते नरेंद्र काळे, महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार माजी महापौर तथा नगरसेविका श्रीकांचना यन्नम, नगरसेवक गौतम कसबे, परिवहन उपक्रमाच्या नियंत्रण अधिकारी तथा संबंधित अधिकारी सारिका आकुलवार यांच्यासह परिवहन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत शहरासाठी प्रस्तावित ई-बस सेवा सुरू करण्याच्या दृष्टीने आवश्यक पायाभूत सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ई-बस डेपोची सज्जता, बस चार्जिंग स्टेशन, दुरुस्ती व देखभाल सुविधा, पार्किंग व्यवस्था, ड्रेनेज, फायर सेफ्टी, CCTV, हायमास्ट प्रकाश व्यवस्था, प्रवेशद्वार, अंतर्गत विद्युत व्यवस्था तसेच EV Charging Infrastructure याबाबत चर्चा करण्यात आली.

ई-बसच्या चार्जिंगसाठी आवश्यक HT वीजजोडणी व वीजपुरवठ्याचे Energization हे महत्त्वाचे असल्याने संबंधित कामांना प्राधान्य देऊन पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. तसेच EV चार्जिंग पायाभूत सुविधांची चाचणी, कार्यान्वयन आणि प्रत्यक्ष संचालनासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमामार्फत डेपोच्या उर्वरित पायाभूत सुविधा कामांना गती देऊन ई-बस सेवा लवकरात लवकर सुरू करण्यासाठी आवश्यक कार्यवाही प्राधान्याने करण्यात येत आहे. ई-बस सेवा सुरू झाल्यानंतर नागरिकांना सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

बैठकीस परिवहन उपक्रमाचे परिवहन व्यवस्थापक इर्णा वन्यालोल्लू, कर्मशाळा अधीक्षक गिरीश आंटद, कनिष्ठ अभियंता सहा. व्यंकटेश गुडशेलू, लेखापाल तथा नोडल अधिकारी पीएम ई-बस गणेश काळे, मुख्य वाहतूक निरीक्षक सतीश गुंड यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.







# ग्रंथपालन परीक्षेत स्नेहा बाचके सोलापूर केंद्रात प्रथम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी घेतलेल्या ग्रंथपालन प्रमाणपत्र परीक्षा-2026 च्या परीक्षेत सोलापूर केंद्रातून 700 पैकी 470 गुण मिळवून स्नेहा श्रीकांत बाचके प्रथम, 469 गुण मिळवून प्रणिती प्रकाश क्षिरसागर द्वितीय तर 468 गुण मिळवून प्रथमेश दत्तात्रय बनसोडे तृतीय आले आहेत. सोलापूर केंद्राचा निकाला 66.66% लागला. राज्यातून 29 केंद्रातून 1904 विद्यार्थी परीक्षेत बसले होते. राज्याचा 61% निकाल लागला.

सोलापूर केंद्रात पहिल्या 3 विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. ग्रंथपालन वर्गाच्या या आमच्या यशात ग्रंथपालन वर्गाचे वर्गव्यवस्थापक ग्रंथमित्र कुंडलिक मोरे, परीक्षाधिकारी श्रीकांत संगेपांग, वर्गाचे मुख्याध्यापक अविनाश गायकवाड सर विषय शिक्षक सौ. वृषाली हजारे, गणेश फंड, जाफर बांगी, दत्ता मोरे वर्गाच्या ग्रंथपाल सौ. सारीका माडीकर, लिपिक गीतांजली गंभिरे, शिपाई दत्ता पोलके, जगदीश सावळगी, प्रदिप गाडे, यांचे सहकार्य असल्यानेच हे यश मिळू शकले असे मनोगत वर्गात प्रथम आलेल्या स्नेहा बाचके यांनी व्यक्त केले. सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष ज्योतीराम गायकवाड, कार्यवाह साहेबराव शिंदे आणि सर्व संचालक मंडळ यांनी अभिनंदन केले आहे.

# नालेसफाई भ्रष्टाचार प्रकरणी नगरसेवक अनंत जाधव यांचे नाराजी पत्र

## महापालिका आयुक्तांच्या कारभाराची तक्रार





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहरातील नालेसफाईत झालेला भ्रष्टाचार उघड झाला असतानाही महापालिका आयुक्त सचिन ओंबासे हे कारवाई करीत नसल्याचे निदर्शनास आल्याने भाजप नगरसेवक अनंत जाधव यांनी आयुक्तांना नाराजी पत्र दिले असून याप्रकरणी पालकमंत्री आणि राज्याचे मुख्यमंत्री यांच्याकडे तक्रार करणार असल्याचा इशारा दिला आहे.

नालेसफाई प्रकरणी तक्रार आल्यानंतर महापालिका आयुक्तांनी चार अधिकाऱ्यांची चौकशी समिती घटित केली होती. त्या चौकशी समितीने अहवाल देऊन १९ अधिकारी/कर्मचारी व मक्तेदार हे आर्थिक नुकसानीस व बेजबाबदारपणा केल्याचे स्पष्टपणे अहवालात नमूद केले होते. अशा सर्वांना आयुक्तांनी कारणे दाखवा नोटीस दिली त्यानुसात तात्काळ कार्यवाही अपेक्षित आहे. पण महापालिका प्रशासनाकडून असे काही होताना दिसत नाही. त्यामुळे आयुक्तांच्या कार्यपद्धतीवर संशय व्यक्त केला जात आहे.

दरम्यान अनंत जाधव यांनी आपल्या पत्रामध्ये प्रचंड नाराजी व्यक्त करताना आपण पत्राचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्कालीन नगर अभियंता सारिका अकोलवार, प्रभारी वरिष्ठ फोरमन गिरीश पुकाळे या मुख्य दोन अधिकारी यांना तात्काळ बडतर्फ करावे आणि नालेसफाई प्रकरणात झालेले महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान संबंधितांकडून वसूल करावे. अन्यथा आपण प्रकरणी अधिकाऱ्यांना वाचविण्याचे प्रयत्न असल्याचे दिसून येते. कारवाई न झाल्यास याबाबत मला नाईलाजास्तव जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे दाद मागावी लागेल याची गांभिर्याने नोंद घ्यावी असा इशारा दिला आहे.

# शेतकऱ्यांच्या वीज समस्यांवर इंद्रजित पवार यांची महावितरणकडे धाव



**उत्तर सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** उत्तर सोलापूर तालुक्यातील शिरापूर उपसा सिंचन योजनेचा पंप नियमित वीजपुरवठ्याअभावी बंद असल्याने तालुक्यातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. हा पंप तातडीने सुरू करण्यासाठी नियमित वीजपुरवठा करावा, अशी मागणी महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांच्याकडे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांनी करण्यात आली. उत्तर सोलापूर तालुक्यातील नागरिक आणि शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध वीज समस्यांबाबत महावितरण कार्यालयात सुनील माने यांची भेट घेऊन निवेदन करण्यात आले. शिरापूर उपसा सिंचनाचा पंप तातडीने कार्यान्वित झाल्यास तालुक्यातील पाणीपुरवठ्यासाठी आवश्यक प्रमाणात पाणी उपलब्ध होण्यास मदत होईल, असे यावेळी सांगण्यात आले.

याशिवाय, जळालेला डीपी बदलल्यानंतर अवघ्या तीन ते चार दिवसांत पुन्हा जळत असल्याने कायमस्वरूपी उपाययोजना करावी, शेतकऱ्यांना दिवसा आठ तास नियमित वीजपुरवठा करावा, आवश्यक ठिकाणी नवीन डीपी उपलब्ध करून द्यावेत आणि वीज समस्या तातडीने सोडविण्यासाठी निवासी वायरमनची नियुक्ती करावी, अशा मागण्या करण्यात आल्या.

उत्तर सोलापूर तालुक्यातील वीजपुरवठ्याच्या समस्या तातडीने सोडवून नागरिक आणि शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी अरुण बारसकर, विनायक सुतार, जिल्हाध्यक्ष, भाजपा ओबीसी मोर्चा, अमोल साठे, शंकर साठे, महादेव कदम आदी उपस्थित होते.

# श्रमिकांच्या प्रश्नांसाठी १६ नोव्हेंबरला २५ हजारांचा मुंबईवर 'पायी लाँग मार्च'



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रे नगरचा रखडलेला गृहनिर्माण प्रकल्प पूर्ण करावा, गोदूताई परुळेकर नगर, कुंभारी येथील नागरी सुविधा तातडीने मार्गी लावाव्यात तसेच विडी, यंत्रमाग, बांधकाम व असंघटित कामगारांच्या प्रलंबित मागण्या मान्य कराव्यात, या मागण्यांसाठी १६ नोव्हेंबर २०२६ रोजी सोलापूरहून मुंबई मंत्रालयाकडे २५ हजार श्रमिक-कष्टकऱ्यांचा पायी लाँग मार्च काढण्यात येणार आहे, अशी घोषणा ज्येष्ठ नेते व माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी पत्रकार परिषदेत केली.

यावेळी आडम मास्तर यांनी सांगितले की, रे नगर प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी २५० कोटी रुपयांचे बीज भांडवल उपलब्ध करून द्यावे. तसेच पायाभूत सुविधांसाठी तयार असलेल्या ४०६ कोटी रुपयांच्या फेरअंदाजपत्रकास मंजुरी देऊन निधी उपलब्ध करावा. गोदूताई परुळेकर नगरातील रस्ते, मलनिःसारण, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनासाठी सुमारे २२५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा.

यंत्रमाग उद्योगातील कामगारांचे किमान वेतन टाईमरेटसह यथास्थिती पीसरेटमध्ये रूपांतरित करून किमान वेतन पुनर्निर्धारित करण्याबाबतच्या अधिसूचनेचा मसुदा विधी व न्याय विभागाकडून तपासून घेतला. तसेच, त्या अधिसूचनेचा सुधारित मसुदा शासनाकडे तातडीने सादर करण्यासंबंधी परिपत्रक दि. १८ मे २०१७ रोजी काढण्यात आले. महाराष्ट्रात गेल्या ९ वर्षांपासून यंत्रमाग कामगारांचा हा प्रश्न प्रलंबित व अनिर्णित राहिलेला आहे. यंत्रमाग कामगारांना पीसरेटप्रमाणे किमान वेतन, सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी मंडळाच्या शिफारसी लागू करून यंत्रमाग कामगार कल्याणकारी मंडळाची तातडीने स्थापना करावी.

असंघटित कामगारांना दरमहा १० हजार रुपये पेन्शन द्यावी. तसेच बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या बंद असलेल्या सर्व योजना व लाभ पूर्ववत सुरू करावेत, अशी मागणी करण्यात आली.

'ही लढाई केवळ मागण्यांची नसून श्रमिक-कष्टकऱ्यांच्या जगण्या-मरण्याच्या अस्तित्वाची आहे. सरकारने तातडीने निर्णय घेतला नाही तर १६ नोव्हेंबरचा पायी लाँग मार्च अधिक व्यापक आणि तीव्र केला जाईल,ह्व असा इशारा कॉ. आडम मास्तर यांनी दिला.

१६ नोव्हेंबर २०२६ रोजी काढण्यात येणाऱ्या लाँग मार्च च्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री, दोन्ही मा.उपमुख्यमंत्री, मा. कामगार मंत्री, मा. उद्योग मंत्री, मा. मुख्य सचिव, संबंधित विभागाचे मा. अपर मुख्य सचिव, मा.प्रधान सचिव, मा. कामगार आयुक्त, मा. अपर कामगार आयुक्त, मा. विभागीय आयुक्त, मा. उपाध्यक्ष म्हाडा, मा. मुख्य अधिकारी म्हाडा, मा. जिल्हाधिकारी, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सोलापूर, मा. अतिरिक्त कामगार आयुक्त व संबंधित अधिकारी यांना ईमेल द्वारे व रजिस्टर पोस्ट मार्फत मागण्यांचे निवेदन पाठवण्यात आले.

पत्रकार परिषदेत १६ नोव्हेंबरच्या लाँग मार्चच्या माध्यमातून सरकारवर निर्णायक दबाव निर्माण करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. लाँग मार्चमध्ये मोठ्या संख्येने श्रमिक, कष्टकरी, विडी कामगार, यंत्रमाग कामगार, बांधकाम कामगार व असंघटित कामगार सहभागी होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

सदर पत्रकार परिषदेत सीटू चे राज्य महासचिव ॲड.कॉ. एम.एच.शेख, माकपचे जिल्हा सचिव कॉ.युसुफ शेख मेजर, नलिनीताई कलबुर्गी, नसीमा शेख, व्यंकटेश कोंगारी, ॲड अनिल वासम, शेवंता देशमुख, रंगप्पा मरेड्डी, म.हनीफ सातखेड आदींची उपस्थिती होती.

### कामगारांच्या प्रमुख मागण्या :

तब्बल २९ वर्षांच्या अविरत संघर्षानंतर महाराष्ट्र शासनाने विडी कामगारांना महागाईच्या निर्देशांकानुसार दि. १ जुलै २०२६ पासून किमान वेतन व विशेष भत्त्यासह रु. ३७९/- देण्याचे अध्यादेश जारी केले आहेत. त्याची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, यासाठी सिटूच्या वतीने विडी कारखानदार व प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. परंतु अद्याप त्याची प्रभावी अंमलबजावणी झालेली नाही.

वास्तविक पाहता, विडी कामगारांना दि. १ जुलै २०२६ पासून जाहीर केलेल्या किमान वेतनाची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. तसेच, माजी आमदार व्यंकप्पा पत्की समितीने विडी कामगारांसाठी केलेल्या शिफारशी लागू करणे गरजेचे आहे. त्यामध्ये गुल्लाकट्टा व छाटविडी बंद करणे, खराब तेंदूपत्ता देणे बंद करणे तसेच विडी कामगारांना देण्यात येणाऱ्या कच्च्या मालातील (तेंदूपत्ता व तंबाखू) चोरीला आळा घालणे आदी मागण्यांचा समावेश आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या उपसचिवांनी दि. २९ जानेवारी २०१५ रोजी किमान मूळ वेतन व विशेष भत्त्यासह अधिसूचना जारी केली. त्यानुसार प्रत्येक यंत्रमाग कामगाराला किमान वेतन लागू होते. दि. १७/१०/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील यंत्रमाग कामगारांचे किमान वेतन दर टाईमरेटसह यथास्थिती पीसरेटमध्ये रूपांतरित करण्याच्या अनुषंगाने तांत्रिक बाबींचा अभ्यास करण्यासाठी मा. एच. के. जावळे समिती गठीत करण्यात आली.

# सांगोला तालुक्यात पाऊस न झाल्याने शेतकरी संकटात

## सरसकट पंचनामे करा- चेतनसिंह केदार सावंत



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत केवळ करपलेल्या पिकांचे पंचनामे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, सांगोला तालुक्यात आजपर्यंत पुरेसा पाऊस झालेला नसल्याने शेतकरी दुष्काळी परिस्थितीमुळे मोठ्या आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. पिकांचे नुकसान, उत्पादनातील घट आणि वाढता शेतीचा खर्च यामुळे शेतकऱ्यांसमोरील अडचणी अधिक गंभीर झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर नुकसानग्रस्त शेतीपिकांचे सरसकट पंचनामे करून एकही शेतकरी शासकीय मदतीपासून वंचित राहू नये, आणि पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ तातडीने मिळावा अशी मागणी जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच ग्रामविकास व पंचायतराज मंत्री आणि सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली.

सांगोला तालुक्यात पाऊस न झाल्याने अनेक शेतकऱ्यांना पिकांची पेरणी करता आलेली नाही. पाऊस पडेल या आशेवर मशागतीसाठी बँका व खासगी सावकारांकडून कर्ज घेतले; मात्र पाऊस न झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.या पार्श्वभूमीवर सांगोला तालुक्यातील नुकसानीचे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने शासकीय मदत द्यावी, अशी ठाम भूमिका जिल्हा परिषद शिक्षण व आरोग्य समितीचे सभापती चेतनसिंह केदार-सावंत यांनी मांडली.

'शेतकऱ्यांच्या संकटाच्या काळात प्रशासनाने कागदोपत्री नव्हे, तर प्रत्यक्ष शेताच्या बांधावर पोहोचून नुकसानीची पाहणी करणे गरजेचे आहे. एकही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी पंचनामे सरसकट आणि तातडीने पूर्ण करण्याची गरज आहे,' असे त्यांनी स्पष्ट केले.

शेतकऱ्यांच्या अडचणी शासनाच्या निदर्शनास आणून देण्याबरोबरच पंचनामे पूर्ण होईपर्यंत आणि पात्र शेतकऱ्यांना मदत मिळेपर्यंत प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल, अशी ग्वाहीही यावेळी चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

# सेवा संकल्प अभियानातून वीज ग्राहकांच्या तक्रारींचे निवारण



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** सेवा संकल्प अभियानांतर्गत महावितरणकडून पंढरपूर महावितरणच्या वतीने तहसील कार्यालय, पंढरपूर येथे जनजागृती माहिती स्टॉल उभारण्यात आला आहे. या ठिकाणी नागरिकांना केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती दिली जात आहे .तसेच वीज ग्राहकांच्या विविध तक्रारींचे निवारण केले जात आहे सोबतच वीज ग्राहकांचे अर्ज स्वीकारले जात असून, यामुळे ग्राहकांचा वेळ आणि श्रम वाचत आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना प्रधानमंत्री सूर्यग्रह मोफत वीज योजनांचे नोंदणीकरण करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच महावितरण संबंधित वीज जोडणी, वीज मीटर तसेच इतर वीज विषयक समस्यांचे निराकरण महावितरणच्या समन्वय अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येत आहे.

या स्टॉलच्या माध्यमातून नागरिकांना वीज बचत ,सौर ऊर्जा वापर, प्रधानमंत्री सूर्यग्रह मोफत वीज योजना, विद्युत सुरक्षा तसेच महावितरणच्या सेवांबाबत माहिती व मार्गदर्शन देण्यात येत आहे. पंढरपूर तालुक्यातून अभियानांतर्गत दि. 17 सप्टेंबरपासून प्रधानमंत्री मोफत सूर्य घर योजनेसाठी 172, नवीन वीज जोडणी 135, स्मार्ट सोलर योजनेसाठी 10 अर्ज प्राप्त झाले आहेत.

सर्वसामान्य नागरिकांना मिळणाऱ्या नागरी सुविधा अधिक सुलभ व पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. वीज जोडणी, वीज दुरुस्ती,स्मार्ट योजना, छतावर वीज निर्मिती करणे आदी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती ग्राहकांना दिली जात आहे तसेच इच्छुक ग्राहकांचे अर्जही यावेळी स्वीकारले जात आहेत.

